# महात्मा गांधीजी यांचे सत्याग्रहविषयक तत्त्वज्ञान

**डॉ. एच. एस. कुचेकर,** तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नेसरी.ता.गडहिंग्लज. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर. kuchekarhs77@gmail.com मोबा. 9922346844

---

**प्रस्तावना :-**

शतकानुशतके दडपल्या गेलेल्या भारतीयांना निर्भय बनवून त्यांच्यातीpल नैतिक शक्ती व आत्मविश्वास जागृत करून, ब्रिटिश अधिसत्तेविरुध्दच्या लढ्याकरीता त्यांना कटिबध्द करणारे, राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व यशस्वीपणे करून राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देणारे, महात्मा गांधी हे आधुनिक काळातील एक युगप्रवर्तक नेते होते. भारतीय इतिहासातील इ. स.1920 पासून ते इ.स 1947 पर्यंत चा कालखंड हा "गांधीयुग" म्हणून ओळखला जातो. यावरून भारतीय जनमानसावर "गांधी" या नावाचा किती प्रभाव होता, याची कल्पना येऊ शकते.

महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ ही देशातील सर्वसामान्य जनतेची चळवळ बनवली. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व करणारी संघटना बनली.त्यांनी स्वातंत्र्यचळवळीला नवा अर्थ, नवे परिमाण प्राप्त करून दिले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी चालविलेल्या लढ्यात सामान्यातल्या सामान्य नागरिकालाही सहभागी होता यावे. या उद्देशाने त्यांनी अनेक प्रयोग केले. लढ्याच्या नवनवीन तंत्रांचा अवलंब केला. त्यायोगे स्वातंत्र्याचा लढा हा खऱ्या अर्थाने सर्व जनतेचा लढा आहे, हा समज त्यानी जनमानसात रुजविला. त्यामुळे गांधीजीनी हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यक्रमाला भारतीय जनतेने अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे नेतृत्व करीत असताना महात्मा गांधींनी वेळोवेळी जे विचार प्रकट केले, आपला कार्यक्रम जनतेला समजावून सांगताना तिच्याशी जो सुसंवाद साधला आणि आपल्या अभिनव मार्गाच्या समर्थनासाठी जो युक्तिवाद केला, त्यातूनच गांधीवादी तत्त्वज्ञानाचा जन्म झाला.[1]

**उदिष्ट्ये :** 1. सत्याग्रह ही संकल्पना समजून घेणे.

2. सत्याग्रहाच्या मूलभूत नियमांचा अभ्यास करणे.

3. सत्याग्रहाची साधने अभ्यासणे

**संशोधन पद्धती**: प्रस्तूत शोधनिबंधासाठी द्वितीय सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यात विविध संदर्भ ग्रंथ, वैचारिक लेख, मासिके, संशोधनपर लेख, इ.चा आधार घेतला आहे

**सत्याग्रह:-**

सत्याग्रह ही म. गांधीजींनी या देशाला नव्हेतर जगाला दिलेली ही एक राजकीय देणगी होय. या त्यांच्या तत्वज्ञानात, सत्याग्रहाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. ही सत्याग्रहाची कल्पना म. गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत सुचली.[2] बलाढ्य साम्राज्यशक्तींशी आत्मिक शक्तींनी लढा देण्याचे सत्याग्रहाचे तंत्र महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेतील वास्तव्यात विकसित केले.

महात्मा गांधींनी सत्याला अंतिम वास्तव मानले होते आणि अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करून सत्याप्रत पोहोचण्याचा मानवाने प्रयत्न केला पाहिजे. असे प्रतिपादन केले होते. परंतु सत्याप्रत जाण्यासाठी किंवा सत्याचा शोध घेण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व्यक्तीने मनोनिग्रह व आत्मबल प्रकट करणे ही आवश्यक असते. कारण अहिंसेच्या मार्गाने सत्याचा शोध घेताना अन्याय, जुलूम, जबरदस्ती, अत्याचार, असत्य यांच्याविरुद्ध लढा देण्याची गरज निर्माण होते. अशा परिस्थितीत मनोनिग्रह व आत्मबल यांच्या आधारावर पुढील वाटचाल करणे शक्य असते. तेव्हा आपले अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मनोनिग्रह व आत्मबलाच्या सहाय्याने मार्गातील अडथळयांशी केलेला मुकाबला म्हणजे सत्याग्रह होय.[3]

**सत्याग्रहाचा अर्थ -**

"सत्याग्रह म्हणजे शुद्ध आत्मिक शक्तीचा अन्याय, दडपशाही आणि शोषण या विरुद्ध केलेला वापर. आत्मविश्वास आणि आत्मकष्ट हे आत्मशक्तीचे दोन गुण आहेत. सत्याग्रहाचे मार्गाने विरोधकांच्या हृदयात परिवर्तन होतेच. सत्याग्रहाचा विचार, उद्देश, विरोधकांना इजा पोहोचवण्याचा नसून त्यांचे अज्ञान दूर करण्याचा असतो". सत्याग्रहाची व्याख्याच अशी करता येईल की, अन्याय, जुलूम आणि हिंसा या विरूध्द अहिंसा आणि न्याय मार्गाने दिलेला लढा म्हणजे सत्याग्रह होय.[4]

सत्याग्रहाचा शब्दशः अर्थ "सत्याकरिता धरलेला आग्रह" असा होतो. म्हणजेच यात मुख्य भर सत्यावर आहे. सत्याच्या प्राप्तीकरिता आग्रही राहून प्रयत्न करावयाचा, ही यामधील महत्त्वाची गोष्ट आहे.

**सत्याग्रहाचे स्वरूप -**

मानवी संस्कृतीच्या विकासातील म.गांधींचे सर्वात महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान होय. सत्याग्रह हे मानवी जीवनाचे शास्त्र व कला असल्यामुळे जीवनाचा जसजसा विकास होत जाईल, तसतसे त्याचेही स्वरूप परिपूर्ण होत जाईल. त्याचे अंतिम स्वरूप कसे राहील, हे आज सांगता येणे अशक्य वाटते. मानवी स्वभावावरील आढळ अंतरिक विश्वास हा सत्याग्रह धर्माचा गाभा असतो. वीस वेळा फसवणूक होऊन ही सत्याग्रही प्रतिस्पर्ध्यावर विश्वास ठेवतो, तो या अंतरिक विश्वासामुळेच. प्रतिस्पर्ध्याच्या शारीरिक अस्तित्वापेक्षा श्रेष्ठतर असे त्याचे नैतिक अस्तित्व आहे. अशा श्रद्धेतूनच त्याच्या मताबद्दल सहिष्णुता बाळगून त्याच्या भूमिकेचा खुल्या मनाने विचार करायला सत्याग्रही तयार असतो. प्रत्यक्ष कृतीचा अवलंब करण्यापूर्वी चर्चा, वाटाघाटी, विचारविनिमय वगैरे मार्ग तो हाताळतो. तत्त्वाशी तडजोड न करता तपशीलासंबंधी तडजोडींना तो तयार राहतो. स्वतःची चूक कोणत्याही टप्प्यावर लक्षात आल्यास प्रांजळपणे ती कबूल करतो. अन्यायाविरुद्ध लढत असतानाही अन्याय करणाऱ्याविषयी सत्याग्रहींच्या मनात सद्भाव टिकून असतो. क्रोधाला प्रेमाने, असत्याला सत्याने व हिंसेला अहिंसेने जिंकायचा प्रयत्न सत्याग्रही सतत करीत असतो.[5]

सत्याचा शोध घेण्याचा प्रमुख मार्ग म्हणून म. गांधीजींनी अहिंसेला महत्त्व दिले आहे. साहजिकच सत्याग्रहातसुद्धा अहिंसेवर भर देण्यात आला आहे. सत्याग्रह हा आत्मक्लेषाचा मार्ग असून प्रतिपक्षाच्या वृत्तीमध्ये परिवर्तन घडवून आणणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. अन्याय किंवा जुलूम करणारी व्यक्ती मग ती कितीही अध:पतीत झालेली असो, तिच्या ठिकाणीदेखील सतप्रवृत्ती वास करते. ही सतप्रवृत्ती सत्याग्रहाने जागृत करता येते. असा विश्वास व्यक्त केला जातो. म्हणून सत्याग्रहात अहिंसेला प्राधान्य असते. प्रतिपक्षाचे हृदयपरिवर्तन घडवून आणणे ही हिंसेच्या नव्हे तर अहिंसेच्या मार्गाने साध्य करावयाची गोष्ट आहे.[6]

सत्याग्रह हा एक जीवनमार्ग आहे. सत्याग्रहाचा उपयोग करून भारतीय लोकांना स्वातंत्र्याचा लढा यशस्वी करता येईल. असा विश्वास म. गांधीजींच्या मनामध्ये निर्माण झाला होता. यावेळी त्यांनी "हिंद स्वराज्य" या पुस्तकात असे प्रतिपादन केले की, भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न शस्त्रबळाने किंवा बौद्धिक चर्चेच्या मार्गाने सुटणार नसून, तो सत्याग्रहाच्याच मार्गाने सुटेल. भारतात त्यांनी सत्याग्रहाचा पहिला लढा निळ पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत बिहारमधील चंपारण्यत दिला. तो लढा यशस्वी करून नंतर त्यांनी गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यावरील अन्याय दूर करण्यासाठी तिथे सत्याग्रह केला व तिथून पुढे भारतातील सत्याग्रह पर्वाला सुरुवात केली.[7]

सत्याग्रहाची व्याप्ती फार मोठी आहे. कोणत्याही क्षेत्रातील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांचा अवलंब केला जाऊ शकतो. सत्याग्रह ज्याप्रमाणे जुलमी शासनसंस्थेविरुद्ध केला जाऊ शकतो, त्याचप्रमाणे निरनिराळ्या क्षेत्रातील नेत्यांच्या दडपशाहीविरुद्ध ही केला जाऊ शकतो. इतकेच नव्हे तर आपले नातेवाईक, शेजारी यांच्याबाबतीत ही त्याचा अवलंब करता येतो.

म. गांधी यांच्या मते, सत्याग्रह हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे. परंतु दुसऱ्या अर्थाने तिचे ते पवित्र कर्तव्यही आहे. ज्यावेळी एखादी शासनसंस्था अन्यायाच्या मार्गाने राज्यकारभार चालविण्याचा दुराग्रह धरते, त्यावेळी अशा शासनसंस्थेविरुद्ध सत्याग्रहाचा अवलंब करून अन्यायाचा प्रतिकार करणे, हे प्रत्येक व्यक्तीचे परम कर्तव्य असते. त्यासाठी कोणतेही कष्ट सोसण्याची तयारीही संबंधित व्यक्तीने ठेवावी लागते.[8]

**सत्याग्रहाचे मूलभूत नियम :-**

गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्ग ज्या तत्वावर आधारलेला आहे. ती तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

1. विरोधकांच्या बाबतीत सौजन्य आणि त्यांचा दृष्टिकोन समजून घेणे. हा सत्याग्रहाचा श्रीगणेशा आहे. जेथपर्यंत त्याच्याशी जमवून घेता येईल तेथपर्यंत जमवून घ्यायचे, ज्यांना अन्याय सोसावा लागतो, त्यांनीच सत्याग्रह करावा. हे सत्याग्रहाचे सारभूत तत्व आहे. अन्याय करण्याकरिता सत्याग्रह होवूच शकत नाही.

2. विरोधकांच्या दोषांचे पाढे न वाचता त्यात जे सर्वोत्कृष्ट असेल ते शोधून काढून त्याला आत्मसात करावे.

3. यथायोग्य उपाय करून झाल्यावरच सत्याग्रह या मार्गाकडे वळावे म्हणजे अन्याय निवारण्याचा एकही सनदशीर उपाय सोडू नये.

4. ज्यासाठी सत्याग्रह करायचा ते कृत्य गंभीर व हानिकारक असले तरच सत्याग्रह न्याय ठरेल. त्याचे स्वरूप सुस्पष्ट असावे. तो व्यक्तिगत स्वार्थासाठी करू नये. मागण्या किमान व योग्य असाव्यात. तडजोडीस नेहमी तयार असावे, परंतु स्वाभिमानाला धक्का लागणार नाही अशीच तडजोड असावी.

5 सत्याग्रही हा आपल्या मनात क्रोधाला थारा देणार नाही. प्रतिपक्षाचा राग तो सहन करील. प्रतिपक्षाचे आघात सहन करील उलट आघात करणार नाही. प्रतिपक्षाच्या जागी स्वतःला समजून त्याची बाजू नीट समजावून घेईल. आत्मक्लेश सहन केल्याने प्रतिपक्षाचे मन समजून घेण्याची वृत्ती जागृत होते.

6. प्रतिपक्ष अडचणीत असेल तेव्हा सत्याग्रह करू नये. त्याला कोंडीत पकडणे, जेरीस आणणे हा यातील उद्देश नाही. विश्वासघात झाला तरी सत्याच्या शक्तीवरील श्रद्धा ढळू देऊ नये.

वरील उद्दिष्टांनी प्रेरित होऊन आणि नियमांचे पालन करून जर सत्याग्रह केला. तरच तो सत्याग्रह आहे, नाहीतर तो दुराग्रही ठरेल.[9]

**सत्याग्रहाची साधनेः-**

**1. असहकार** - असहकार हे सत्याग्रहाचे एक महत्वपूर्ण साधन आहे. 1920 मध्ये नागपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात असहकाराचा ठराव प्रचंड बहुमतानी मंजूर झाला, भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात म.गांधीजींनी असहकाराच्या मार्गाचा अवलंब केला होता.

असहकाराच्या चळवळीमागील गांधीजींचा विचार असा होता की, कोणतीही शासनसंस्था जनतेच्या सहकार्यावर व पाठिंब्यावरच राज्यकारभार चालवू शकते. शासनसंस्थेला सहकार्य देणे हे जनतेचेही कर्तव्य असते. परंतू जेव्हा एखादे सरकार लोकहिताकडे दुर्लक्ष करून अन्यायाने राज्य करू लागते. तेव्हा त्या सरकारशी सहकार्य न करणे हे देखील तेथील जनतेचे कर्तव्य ठरते.

असहकारितेच्या चळवळीत म. गांधींनी भारतीय जनतेला जो कार्यक्रम दिला, त्यात सरकारी कार्यालये व न्यायालये यांच्या कामकाजात भाग न घेणे, सरकारी शाळा व महाविद्यालये यावर विद्यार्थ्यांनी बहिष्कार टाकणे, परकीय मालावर बहिष्कार टाकणे, सरकारी नोकऱ्यांचा त्याग करणे, सरकारचे कर व सारा भरण्यास नकार देणे, सरकारने दिलेले मानसन्मान परत करणे, स्वदेशीचा वापर करणे अशा कार्यक्रमांचा समावेश होता. या काळात आपल्या भाषणातून गांधीजी जनतेला सांगत असत की, असहकार आंदोलनाला जनतेचा पुरेसा प्रतिसाद मिळाला आणि हे आंदोलन अहिंसात्मक मार्गाने चालू राहिले, तर आपण एक वर्षाचे आत स्वराज्य प्राप्तीचे उद्दिष्ट प्राप्त करू शकू. अनेकांना ही कल्पना हास्यास्पद वाटली. पण असहकारितेचा कार्यक्रम जनतेने स्वीकारला तर त्याची परावलंबित्वाची भावना दूर होऊन त्यांच्यात स्वतंत्रवृत्ती निर्माण करणे आणि स्वराज्याचा तोच तो मूलमंत्र होय अशी गांधीजींची भावना होती.

**2. सविनय कायदेभंग-** सविनय कायदेभंग करणे हा व्यक्तीचा जन्म सिद्ध हक्क आहे. असे सांगून म. गांधीजींनी 1930-31 मध्ये सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. राज्यकर्त्यांनी जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करून, अन्यायी कायदे करून राज्यकारभार चालविला, तर ते अन्यायी कायदे लोकांनी पाळू नयेत. अर्थात कायदेभंगाची चळवळ अहिंसात्मक मार्गानेच झाली पाहिजे. त्याबाबत होणारी शिक्षा भोगण्याची तयारी सत्याग्रही व्यक्तीने ठेवली पाहिजे. "सविनय कायदेभंगाचा आचार करणारे महात्मा गांधी हे गेल्या पाचशे वर्षातील जगामधील सर्वात महान राजकीय नेते होते." असे उद्गार डॉ. राम मनोहर लोहिया यांनी काढले होते. गांधीजींनी सविनय कायदेभंगाचे एक नवे अस्त्र जनतेला दिले होते. सॉक्रेटिस व थोरो या विचारवंताच्या कायदेभंगाच्या कल्पनेतूनच गांधीजींनी सविनय कायदेभंगाची कल्पना मांडली आणि प्रत्यक्षात तिचे आचरण केले.[10]

1930 साली मिठाचा सत्याग्रह करून गांधीजींनी कायदेभंगाची सुरुवात केली. दांडी यात्रा (मिठाचा सत्याग्रह) हा गांधीजींच्या जीवनातील परमोच्च प्रसंग होता. स्वातंत्र्यलढ्यातील या अभिनव पर्वाला "यात्रा" असे संबोधून गांधीजींनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे पावित्र्य जगाच्या मनावर बिंबवले आणि भारतीय जनतेच्या अंत:करणाला हात घातला. स्वातंत्र्य चळवळीचे पहिले पाऊल म्हणून दांडीयात्रेची सफलता महत्त्वपूर्ण वाटते. कायदे जर अन्यायी असतील तरच कायदेभंग करायचा आणि जे कायदे उपयुक्त आहेत व योग्य आहेत त्यांचे पालन करावयाचे अशी भूमिका कायदेभंगाच्या चळवळीत मान्य केली होती.

**3. उपोषण** - उपोषण हे सत्याग्रहाचे प्रभावी साधन आहे. हे तंत्र अत्यंत योग्य वेळीच वापरावयाचे असते. उपोषण हे साधन वापरणारी व्यक्ती आत्मबलसंपन्न व संयमी असावी लागते. "स्वतः क्लेश सहन करून दुसऱ्याचे हृदयपरिवर्तन घडवून आणणे व त्याला दुष्कृत्यापासून परावृत्त करणे, यास उपोषण असे म्हणतात." गांधीजींनी 1933 मध्ये हरिजनांची सेवा अधिक चांगल्या प्रकारे करता यावी. म्हणून 21 दिवस आत्मशुद्धीचे उपोषण केले होते. तसेच 1947 साली हिंदू- मुस्लिम ऐक्यासाठीही त्यांनी उपोषण केले होते.[11]

**4. हरताळ** – म. गांधीजींच्या मते, हरताळ ऐच्छिक असावा. लोकांच्या व सरकारच्या निदर्शनास एखादी गोष्ट आणणे. या हेतूने हरताळ पाळला जातो. हृदयपरिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकांनी हरताळाचा मार्ग स्वीकारावा. परंतु हरताळाचा मार्ग क्वचित

प्रसंगीच वापरला जावा. हरताळाचे वैशिष्ट्य असे की, हरताळामध्ये हिंसा घडत नाही, अराजक निर्माण होत नाही, त्यामुळे प्रतिपक्षावर एक मोठा दबाव येतो. त्यामुळे हरताळ या साधनाला खऱ्या अर्थाने पूर्ण नैतिक असे स्वरूप आहे.

**5. बहिष्कार**- म. गांधीजींच्या मते, बहिष्कार हे सत्याग्रहाचे प्रमुख व महत्त्वाचे साधन होय. गांधीजींच्या आज्ञेनुसार भारतीय जनतेने परदेशी मालावर पूर्णपणे बहिष्कार टाकला होता. एवढेच नव्हे तर सरकारी कचेऱ्या, न्यायालये, शाळावर ही बहिष्कार टाकण्यात आला होता. बहिष्कार हा राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रात ही उपयुक्त ठरतो.

**6. हिजरत (देशत्याग) -** जेव्हां एखाद्या भागात जनतेवर सतत अत्याचार होत असतील, सतत मानभंग होत असेल आणि अहिंसात्मक मार्गाने प्रतिकार करणे अशक्य असेल तर अशा वेळी जनतेने तो प्रदेश सोडावा व दुसरीकडे जावे. हिजरतचा सल्ला म. गांधीजींनी 1928 व 1939 मध्ये बोर्डोली, जुनागड, विठ्ठलगड आणि लिंबर्डी येथील जनतेला दिला होता. तसेच बोरसाड, जांबुसर या गावीही हिजरत सत्याग्रह करण्यात आला. ज्यांना अपमान व अन्याय सहन करणे अशक्य आहे व जे हिंसा किंवा अहिंसा या दोन्ही मार्गांनी प्रतिकार करण्यास असमर्थ आहेत त्यांनी हिजरत या सत्याग्रहाचा अवलंब करावा असे म. गांधीजींचे मत होते.[12]

**7. निरोधन** – म.गांधीजींच्या मते, निरोधन म्हणजे प्रतिबंध करणे होय. ज्याच्याकडून अन्याय, अत्याचार होतो. त्याच्याविरुद्ध निरोधनाचा मार्ग वापरून त्याला त्याच्या कृत्यांची जाणीव करून द्यावी. निरोधनाचा मार्ग स्वीकारताना त्यात सामर्थ्याचा वापर करू नये. केवळ विरोध दर्शवून मत परिवर्तन घडवून आणणे, हा निरोधनाचा प्रमुख हेतू असतो. विदेशी मालावर बहिष्कार व दारूबंदी यासाठी निरोधनाचा मार्ग म.गांधीजींनी वापरला होता.

**8. धरणे** – **गांधीजींच्या मते,** "धरणे " धरणे हा सत्याग्रहाचा मार्ग अत्यंत काळजीपूर्वक व जबाबदारीने स्वीकारावा लागतो. धरणे म्हणजे समाजातील एखाद्या अन्यायी, अत्याचारी व्यक्तीला जननिंदेद्वारे लज्जित करणे होय. हिंसा, दबाव, धमकी, घेराव या मार्गाचा अवलंब न करता "धरणे" धरणे हा सत्याग्रहाचा प्रयोग करावा. अत्याचारी व्यक्तीची चूक समाजाच्या नजरेस आणून त्या व्यक्तीला ती चूक कळावी असा उद्देश धरणे सत्याग्रहाच्या पाठीशी असतो.[13]

**9. संप**- म. गांधींच्या मते, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी संपाचे हत्यार वापरावे. परंतु सत्ता प्राप्त करण्यासाठी संपाचा वापर करू नये. मात्र अन्याय, जुलूम यांचा प्रतिकार करण्यासाठी संपाचा अवलंब करावा. म. गांधीजींच्या मतानुसार संप हा देखील हृदयपरिवर्तनाचाच मार्ग आहे. कामगारांनी आपले काम बंद करून स्वतः आत्मक्लेश सहन करावेत आणि भांडवलदारांना त्यांची चूक दुरुस्त करण्यास भाग पाडावे, असे म. गांधीजींचे म्हणणे आहे.

**सारांश -** म. गांधीजींनी सत्याग्रहाचे विविध मार्ग सांगून स्वतः त्या मार्गाचा अवलंब केला. केवळ देशांतर्गत बाबीसाठी सत्याग्रहाचा मार्ग न वापरता, ब्रिटिश सत्तेला प्रतिकार करण्यासाठी या मार्गाचा वापर त्यांनी केला होता. म. गांधीजींनी सत्याग्रह हे नवे तंत्र केवळ भारतालाच नव्हे, तर जगाला दिले आहे. अन्यायी, अत्याचारी व जुलमी सत्तेला विरोध करण्याचा हा अहिंसात्मक मार्ग म्हणजे एक अभिनव कल्पना होय. अर्थात म. गांधीजींनी सामुदायिक सत्याग्रहाला अधिक महत्त्व दिले होते.

**संदर्भ -**

1. प्रा.पाटील, विलास, (1992). भारतीय राजकीय विचार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पृ. 84
2. प्राचार्य. उभाळे, (डॉ.) विजय हिरालाल,(संपा), (2016). सद्यस्थितीत महात्मा गांधी, पंडित नेहरू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची गरज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. 2016. पृ.84
3. प्रा. पाटील, विलास, (1992), पूर्वोक्त, पृ.97
4. पाटील, (डॉ.) वा. भा., (2009). आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. पृ.38
5. भोळे, (डॉ). भास्कर लक्ष्मण, (1995). भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर. पृ.118
6. प्रा. पाटील, विलास, (1992), पूर्वोक्त पृ. 97-98
7. देवगावकर, (डॉ). एस. जी. आणि प्रा. येरनकर श्रीराम, (1999). राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर. पृ.156
8. प्रा. पाटील विलास,(1992), पूर्वोक्त पृ.98
9. देवगावकर, (डॉ). एस. जी. आणि प्रा. येरनकर श्रीराम, (1999). पूर्वोक्त. पृ.156 – 57
10. प्रा. पाटील, बी. बी., प्रा. सौ. चव्हाण उर्मिला, ( 2004). भारतीय राजकीय विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृ.103
11. कित्ता.पृ.104
12. कित्ता.पृ.104-105
13. कित्ता.पृ.105